स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● शुक्रवार, दिनांक १५ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# गोरगरिबांना वाट्टेल तशी अरेरावी करणाऱ्या गॅस एजन्सी चालकांचे कान टोचण्याची थोडीही हिंमत बीड जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यात नाही का?

**एसीत बसलेल्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी गोरगरीब आणि सर्वसामान्य जनतेशी फारकत घेतल्याने गॅससाठी भर उन्हात रांगाच रांगा!!**

**गॅस न मिळाल्याने बीड शहरात एखादे हॉटेल बंद पडले असे उदाहरण नाही, तर गोरगरीब वगळता एकही श्रीमंत गॅससाठी रस्त्यावर नाही!!**

**पुरवठा अधिकारी खिशात घेऊन फिरतात अशा अविर्भावात गॅस एजन्सीवाल्यांकडून सर्वसामान्य जनतेला अरेरावी केल्याच्या तक्रारी!!**

## सर्वच गॅस एजन्सीकडून हॉटेल आणि श्रीमंतांसाठी पायघड्या, घरपोच सेवा!!

**बीड : प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्रात पुरवठा साखळीतील अडचणींमुळे घरगुती गॅस सिलिंडरचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. वेळेवर सिलिंडर न मिळणे, बुकिंग आपोआप रद्द होणे आणि एजन्सीकडून योग्य माहिती न मिळण्यामुळे सर्वसामान्य नागरिक अत्यंत हैराण झाले आहेत. एकंदरीत बीड शहरातील ही परिस्थिती पाहता जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या हाताबाहेर गेलेली दिसून येत आहे. विशेष म्हणजे गोरगरीब आणि सर्वसामान्य जनतेला गॅस एजन्सी चालकांकडून थेट अर्वाच्य भाषेत अरेरावी केल्याच्या तक्रारी सर्वसामान्य जनतेमधून व्यक्त केल्या जात आहेत. ही परिस्थिती हाताळण्याची थोडीशी ही हिम्मत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांमध्ये नाही का? असा रोकडा सवाल देखील उपस्थित केला जात आहे. तसेच गॅससाठी गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या भर उन्हात रांगा दिसून येत असताना दुसरीकडे मात्र शहरातील हॉटेल व्यवसायिकांना आणि श्रीमंतांना मात्र वेळेत आणि घरपोच गॅस मिळत असल्याचे बोलले जात आहे. म्हणूनच एकही श्रीमंत किंवा हॉटेल व्यावसायिक गॅससाठी भर उन्हात रांगेत आजपर्यंत दिसून आला नाही. एकूणच बीड जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर सर्वसामान्य जनतेमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून या व अशा संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत.




**नागरिकांच्या प्रमुख समस्या!**

अनेकदा गॅस बुकिंग करून आणि ओ.टी.पी. (DAC Code) मिळूनही प्रत्यक्ष सिलिंडर मिळण्यासाठी १५ ते २० दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. नोंदणी करूनही बुकिंग आपोआप रद्द होण्याचे प्रकार वाढले आहेत. एजन्सीचा मनमानी कारभारामुळे एजन्सीचे फोन लागत नाहीत किंवा ग्राहकांना उन्हामध्ये ताटकळत उभे राहावे लागत आहे.

**एसीत सुस्त बसलेल्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी**

अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी बीड शहरातच नव्हे तर एकंदरीत ही परिस्थिती थोड्या बहुत फरकाने बीड जिल्ह्यात पहावयास मिळत आहे. अशा प्रकारचा गॅस तुटवडा निर्माण झाल्याने स्थानिक प्रशासनावर विशेषता जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या समस्येच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली जात आहे. मात्र एवढे सगळे डोक्यावरून पाणी गेलेले असताना एसीमध्ये सुस्त बसलेल्या प्रशासनाने अद्याप या प्रश्नाकडे अपेक्षित असे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

### ओटीपी व बुकिंग क्रमांक मिळूनही प्रत्यक्ष सिलिंडर मिळत नसल्याची तक्रार

● घरगुती वापरासाठी लागणाऱ्या गॅसचा पुरवठा मात्र पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे चित्र दिसत आहे. बीड शहरातील अनेक गॅस एजन्सी चालकांकडून वेळेत आणि गोरगरिबांना संघर्ष केल्याशिवाय सेवा दिली जात नाही, हे वास्तव आहे. गॅस मिळवण्याच्या अनुषंगाने सर्वात मोठे दुर्दैव म्हणजे अनेक नागरिकांनी गॅस बुकिंग केल्यानंतर ओटीपी व बुकिंग क्रमांक मिळूनही प्रत्यक्ष सिलिंडर मिळत नसल्याची तक्रार केली आहे.

### हेल्पलाईन क्रमांकांवरही संपर्क होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये संताप

● गॅस एजन्सीच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता फोन लागत नसल्याचे नागरिक सांगतात. तसेच एचपी कंपनीच्या इतर हेल्पलाईन क्रमांकांवरही संपर्क होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. काहीशी अशीच परिस्थिती थोड्या बहुत फरकाने भारत गॅसची असल्याचे सांगितले जाते.

● एकूणच परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, सुमारे 900 रुपयांचा गॅस सिलिंडर गॅस चालकांच्या दारात जाऊन 939 रुपयांना देखील मिळत नाही हीच बोंब संपूर्ण बीड जिल्ह्यात ऐकवास मिळत आहे.



# पालखी मार्गाच्या विकासाला मुख्यमंत्री फडणवीस यांची गती

**आष्टी** : वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड ते पंढरपूर पालखी मार्गाच्या विकासासाठी बुधवारी आष्टी येथे महत्वपूर्ण बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या मार्गाच्या विकासासाठी आवश्यक प्रक्रिया गतीने सुरू करण्यात आल्याची माहिती यावेळी आ.सुरेश धस यांनी दिली.

आष्टी येथील आ.सुरेश धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी झालेल्या बैठकीत पालखी मार्गाचा आराखडा, रस्त्याची रुंदी, लांबी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या मार्गांचे सर्वेक्षण आणि अंतिम मार्ग निश्चितीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज यांनी सुचविलेल्या या पालखी मार्गामध्ये बीड, अहमदनगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांचा समावेश करण्यात आला आहे. वारकरी भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या या मार्गाचा दर्जेदार व गुणवत्तापूर्ण विकास व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ.सुरेश धस यांनी पत्रव्यवहार केला होता. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्काळ दखल घेत संबंधित विभागाला सर्वेक्षण



**आ.धस यांच्या निवासस्थानी महत्वपूर्ण बैठक संपन्न**

व आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याचे बैठकीत सांगण्यात आले. या प्रस्तावित पालखी मार्गात पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, निवडुंगा, वाहली, सावरगाव, मुगगाव, इंचरणा, केकाण वस्ती, वनवेवाडी, आष्टी तालुक्यातील मातावळी, मातकुळी, जामखेड तालुक्यातील जामवाडी, जमदरवाडी, सारोळा, खुर्दैठण, घोडेगाव, आपटी, उंडा पिंपळगाव, सटवाई जवळके, शिंदे वस्ती, परंडा तालुक्यातील चिंचपूर, मशिदीचे, पाटलाचे पांढरवाडी, शेळगाव, तांदळवाडी, देऊळगाव, डोणजे कसाबाचे, बंगालवाडी, मिरगव्हाण तसेच करमाळा तालुक्यातील हिवरे नागोबाचे, लावंडे वस्ती, सालसे, आळसुंदा, वरकुटे, रोपणे, भोगेवाडी, जवळस, अंबड शिराळाचे, विठ्ठल टोणपे वस्ती, अरण, जाधववाडी, बार्डी, मेंढापूर, पखाल, पद्मावती गणपती मार्गे पंढरपूर असा विस्तृत समावेश आहे. या मार्गामुळे वारकरी भाविकांना सुविधा उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण भागातील दळणवळण, व्यापार आणि विकासालाही मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह.भ.प. विठ्ठल महाराज, सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ धाराशिवचे अधीक्षक अभियंता बंडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टीचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ उपस्थित होते.

# बीड बायपासला सोमवारी शेतकरी करणार रास्ता रोको

**बीड / प्रतिनिधी** :
बीड शहरा लगत असलेल्या बीड बायपास वरील इमामपूर रोड येथील सर्विस रोड व स्लिप रोड ६०० मीटर वाढवण्या संदर्भात वारंवार पत्र व्यवहार करूनही काम न झाल्यामुळे बीड बायपासला सोमवार दि.१८ मे २०२६ रोजी सकाळी १० :०० वा. रस्ता रोको करण्याचा शेतकऱ्यांचा निर्धार करण्यात आला आहे.

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ हा अतिशय चांगल्या दर्जाचा रस्ता सन २०१९-२० मध्ये बी.ओ.टी. तत्वावर पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी हा रस्ता करत असतांना जुना सोलापूर-धुळे-मांजरसुंबा येथुन येणारा रस्ता छत्रपती संभाजी राजे चौक ते इमामपूर रोड इथपर्यंत रोडची उंची जास्त आहे व संबंधीत क्षेत्रात रोडच्या दोन्ही बाजुने शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत, त्या रोडची उंची असल्यामुळे शेती करता येत नाही.

सध्या इमामपूर रोडला स्लिप रोड व सींस रोड मंजूर असून त्याचे काम चालू आहे, तसेच छत्रपती संभाजी राजे चौक बार्शी रोड येथे पण स्लिप रोड व सर्व्हस रोड मंजूर असून त्याचे पण काम चालू आहे. याच रोडवर समनापूर कडे जाणारा २० फुटाचा रस्ता आहे, इमामपूर रोड ते छत्रपती संभाजी राजे चौक या स्लिप रोडला जर ६०० मीटर आंतर वाढवले तर शेतकऱ्यांना शेती करण्यास व कोल्हारवाडी, समनापूर, इमामपूर, शिंदे वस्ती या गावांना याचा फायदा होईल. यासाठी वारंवार या संदर्भात पत्र व्यवहार करून सुध्दा यावर लक्ष दिले नाही, म्हणून या परिसरातील सर्व शेतकरी सोमवार दि.१८ मे २०२६ रोजी सकाळी १० :०० वाजता बीड बायपास वरील संबंधीत जागेवर रस्ता रोको करणार आहोत.

याबाबत क्षेत्रीय अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण नागपुर, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, पोलीस निरीक्षक साहेब, पोलीस स्टेशन बीड ग्रामीण यांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनावर ॲड. सुभाष राऊत, वामन लिंबाजी शिंदे, दिगंबर तुलसीराम शिंदे, अंकुश तुळशीराम शिंदे, मच्छिंद्र बाबुराव वाणी, रवींद्र मच्छिंद्र माने, जयदीप पांडुरंग पवार, भगवान लिंबाजी शिंदे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**कृषी उत्पन्न बाजार समितीचा निर्णय** ➤ माजलगाव तालुक्यात परवाना घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट

# विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**माजलगाव : प्रतिनिधी**

तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती माजलगाव बाजार समितीचे चे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे आणि सचिव हरिभाऊ सवणे यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता कायम राखण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र कृषी






जयदत्त नरवडे, सभापती — श्रीहरी मोरे, उपसभापती — हरिभाऊ सवणे, सचिव

उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ तसेच नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. मात्र, तालुक्यातील काही ग्रामीण भागात अनेक व्यापारी, संस्था आणि काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही अधिकृत परवान्याविना शेतमाल खरेदी-विक्री करत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. यासंदर्भात बाजार समितीकडून वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच परिपत्रकही जारी करण्यात आले होते. तरीदेखील काही व्यापारी व संस्था नियमांचे उल्लंघन करून व्यवहार करत असल्याने आता संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

दि.८ मे २०२६ रोजी मा. पणन संचालक कार्यालय तसेच दि.११ मे २०२६ रोजी मा. जिल्हा उपनिबंधक कार्यालय, Beed यांच्या वतीने जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी अधिकृत परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

त्यामुळे माजलगाव तालुक्यात शेतमाल खरेदी-विक्री व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांनी तात्काळ आवश्यक परवाना घ्यावा, अन्यथा नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन बाजार समिती प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

● माजलगाव तालुक्यात विनापरवाना शेतमाल व्यापारावर कारवाई होणार ● बाजार समितीकडून व्यापारी व संस्थांना इशारा ● कृषी उत्पन्न बाजार समितीचा परवाना अनिवार्य ● शेतकऱ्यांच्या हितासाठी पारदर्शक व्यवहारांवर भर ● नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाईची तयारी

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका,अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# रोमहर्षक अंतिम लढतीत पारगाव संघाचा विजय; स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब चषकावर नाव कोरले

### भोगलवाडीत रंगल्या क्रिकेट स्पर्धा ; विजेत्या संघाला ३१ हजारांचे पारितोषिक, पंचक्रोशीतून क्रिकेटप्रेमींची मोठी गर्दी



**माजलगाव / प्रतिनिधी :** भोगलवाडी जिल्हा परिषद गटांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब चषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेतील अंतिम सामना पहाडी पारगाव क्रिकेट संघ आणि भोगलवाडी क्रिकेट संघ यांच्यात रंगला. अत्यंत अटीतटीच्या आणि रोमांचक झालेल्या या सामन्यात पहाडी पारगाव संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यास पंचक्रोशीतील युवक, ज्येष्ठ क्रिकेटप्रेमी आणि क्रीडारसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. सामन्यातील प्रत्येक क्षण प्रेक्षकांसाठी उत्कंठावर्धक ठरत होता. विजयानंतर पारगाव संघाच्या खेळाडूंनी जल्लोष करत मुंडे साहेब चषकावर आपले नाव कोरले.

या क्रिकेट स्पर्धेची सुरुवात भाजपा युवक जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या हस्ते टॉस उडवून करण्यात आली. यावेळी स्पर्धेचे आयोजक निखिल भैय्या मुंडे, शिवाजी अप्पा मुंडे, लालासाहेब तिडके, तुकाराम महाराज तिडके, महादेव नाना तिडके, बाबाराय बडे, रामप्रभू बाबा मुंडे, गणेश भैय्या बडे, निलेश भैय्या मुंडे, रामदास भैय्या तिडके यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी आणि निर्विघ्न पार पाडण्यासाठी भोगलवाडी येथील नवतरुण मंडळींनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या नियोजनबद्ध आयोजनाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. विजेत्या पहाडी पारगाव क्रिकेट संघाला प्रथम क्रमांकासाठी ३१ हजार रुपये नगद व आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तर अंतिम सामन्यात उपविजेते ठरलेल्या भोगलवाडी क्रिकेट संघाला २१ हजार रुपये नगद व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. विशेष म्हणजे सामना अधिक रंगतदार व्हावा यासाठी आयोजकांनी प्रत्येक षटकारासाठी फलंदाजाला ५०० रुपये आणि प्रत्येक विकेटसाठी गोलंदाजाला ५०० रुपये रोख बक्षीस जाहीर केले होते. या विशेष पुरस्कारांमुळे खेळाडूंमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला असून अंदाजे १५ हजार रुपयांहून अधिक रकमेची अतिरिक्त बक्षिसे वितरित करण्यात आली.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- भोगलवाडी येथे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब चषक क्रिकेट स्पर्धांचे आयोजन
- अंतिम सामन्यात पारगाव संघाने भोगलवाडी संघाचा पराभव केला
- विजेत्या संघाला ३१ हजार रुपये व ट्रॉफी प्रदान
- उपविजेत्या भोगलवाडी संघाला २१ हजार रुपये व ट्रॉफी
- प्रत्येक षटकार आणि विकेटसाठी रोख बक्षिसांची घोषणा
- पंचक्रोशीतील क्रिकेटप्रेमींची मोठी उपस्थिती

# माजलगावात 'दत्तकृपा होमिओपॅथी क्लिनिक'चे शानदार उद्घाटन

### - डॉ. शंतनू रत्नपारखे यांच्या माध्यमातून रुग्णांना आधुनिक होमिओपॅथिक उपचारांची सुविधा



**माजलगाव / प्रतिनिधी :** येथे 'दत्तकृपा होमिओपॅथी क्लिनिक'चे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. येथील प्रसिद्ध व्यक्तिमत्व एन डी रत्नपारखे यांचे चिरंजीव डॉ. शंतनू रत्नपारखे यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या या क्लिनिकमुळे आता शहरातील तसेच परिसरातील रुग्णांना विविध जुनाट आजारांवर आधुनिक आणि प्रभावी होमिओपॅथिक उपचार उपलब्ध होणार आहेत.

उद्घाटन समारंभाला सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यामध्ये भाई मुंजा पंचाळ, परमेश्वर आमसुले, किशोर पंचाळ आणि गणेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी डॉ. शंतनू रत्नपारखे यांच्या वैद्यकीय सेवेचे कौतुक करत हे क्लिनिक सर्वसामान्य रुग्णांसाठी विश्वासार्ह आरोग्यसेवा केंद्र ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

**या आजारांवर मिळणार विशेष उपचार**

'दत्तकृपा होमिओपॅथी क्लिनिक'मध्ये विविध आजारांवर आधुनिक पद्धतीने उपचार केले जाणार आहेत. त्यामध्ये पोटाचे विकार, पित्त, अपचन, गॅसेस, दीर्घकालीन पचन समस्या, त्वचारोग, सोरायसिस, इसब, संसर्गजन्य त्वचारोग, तसेच मुळव्याध व मुतखडा यांसारख्या समस्यांवर शस्त्रक्रियाविरहित उपचारांचा समावेश आहे. याशिवाय थायरॉईड, यूरिक ॲसिड वाढणे, गाऊट आणि जीवनशैलीशी संबंधित इतर आजारांवरही विशेष उपचार सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

"होमिओपॅथी ही केवळ आजाराची लक्षणे कमी करण्यापुरती मर्यादित नसून आजाराच्या मुळावर उपचार करण्यासाठी प्रभावी ठरते. प्रत्येक रुग्णाला वैयक्तिक लक्ष, योग्य निदान आणि विश्वासार्ह उपचार देण्याचा आमचा प्रयत्न असेल," असे डॉ. शंतनू रत्नपारखे यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, या क्लिनिकच्या शुभारंभामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून जास्तीत जास्त रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रत्नपारखे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- माजलगावात दत्तकृपा होमिओपॅथी क्लिनिक सुरू
- डॉ. शंतनू रत्नपारखे यांच्या पुढाकारातून उपक्रम
- जुनाट व जीवनशैलीशी संबंधित आजारांवर विशेष उपचार
- विविध मान्यवरांची उद्घाटन प्रसंगी उपस्थिती
- रुग्णांना वैयक्तिक लक्ष व योग्य निदानावर भर

# लोणगावात वादळी वाऱ्याचा फटका; विहिरीवरील सोलार पम्पाचे मोठे नुकसान

### ● सोलार प्लेट उखडून यंत्रणा विस्कळीत ● नुकसानग्रस्त शेतकऱ्याकडून पंचनाम्याची मागणी

**माजलगाव / प्रतिनिधी :** तालुक्यातील लोणगाव येथे झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे शेतातील विहिरीवर बसविण्यात आलेल्या सोलार पम्पाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कचरू एकनाथ सोनकांबळे यांच्या मालकीची गट क्रमांक ९६ मधील शेती असून या शेतातील विहिरीवर CRI Pumps कंपनीचा सोलार पम्प बसविण्यात आला होता. दि. १३ मे २०२६ रोजी परिसरात अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे सोलार पाट्या आणि सोलार प्लेटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वादळी वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने अनेक सोलार प्लेट उखडून पडल्या तसेच संपूर्ण यंत्रणा विस्कळीत झाली. त्यामुळे शेतातील पाणीपुरवठा बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली असून आगामी पिकांवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या नुकसानीमुळे संबंधित शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शासनामार्फत नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, परिसरातील शेतकऱ्यांनीही नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- लोणगाव येथे वादळी वाऱ्यामुळे सोलार पम्पाचे नुकसान
- विहिरीवरील सोलार प्लेट उखडून पडल्या
- शेतातील पाणीपुरवठा बाधित होण्याची शक्यता
- शेतकरी आर्थिक संकटात
- प्रशासनाकडे पंचनामा व मदतीची मागणी

# "वादळी वारे, विजांचे कडकडाट, अवकाळी पावसाने उध्वस्त केली कऱ्हेवडगाव परिसरातील शेती; शेतकरी हतबल"

### आष्टीत अवकाळीचा थरार : उन्हाळी पिके उद्ध्वस्त, फळबागा कोसळल्या, विद्युत पुरवठा खंडित"

### "कऱ्हेवडगावसह परिसरात चक्रीवादळाचा तडाखा; महसूल प्रशासन जमिनीवर, शेतकऱ्यांची भरपाईची मागणी"







**आष्टी / प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील कऱ्हेवडगाव, कऱ्हेवाडी, पांगुळगव्हाण, पोखरी व परिसरात दिनांक १३ मे २०२६ रोजी दुपारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटात झालेल्या अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या निसर्गकोपामुळे शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली असून, उन्हाळी पिके व फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे.

शेतकरी सांगतात की, काही दिवसांपासून तापमान ४३ अंश सेल्सिअसवर होते. मात्र अवघ्या काही तासांतच आभाळाने पालट घेतला. वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतातील आंबा, लिंबू व संत्रा या फळबागांची झाडे उन्मळून पडली. काढणीला आलेले उन्हाळी कांदे पावसात भिजून निकामी झाले. जनावरांचे गोठे व घरांची पत्रे उडून गेल्याने ग्रामस्थांनी रात्र उघड्यावर घालवली. विजेच्या तारा व खांब कोसळल्याने विद्युत पुरवठा पूर्णपणे खंडित झाला असून, स्थानिक विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी दुरुस्तीच्या कामात गुंतले आहेत.

प्रशासनाची कारवाई :

घटनेनंतर लगेचच महसूल विभागाचे तलाठी छाया मेश्राम व कोतवाल दादा शिंदे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. तसेच नुकसानग्रस्त भागांचा पंचनामा सुरू करण्यात आला आहे. शेतकरी सुनील पाटील, महादु पवार यांनी नुकसानभरपाई तात्काळ देण्याची मागणी केली आहे. एका शेतकऱ्याने सांगितले, "हंगामभर मेहनत केली, पण एका तासाच्या पावसाने सर्व उध्वस्त केले. सरकारने पंचनामा करून त्वरित मदत द्यावी." सूत्रांच्या माहितीनुसार, स्थानिक अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविण्यात आला असून, नुकसानीचे सर्वेक्षण सुरू आहे. दरम्यान, परिसरातील विद्युत पुरवठा पुनर्संचयित करण्यासाठी प्रशासनाच्या सूचनेवरून काम सुरू असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## विशेष

## अंधानेर फाट्याजवळील सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण हटवण्याची मागणी

➤ कन्नड / प्रतिनिधी :
तालुक्यातील अंधानेर फाट्याजवळ राष्ट्रीय महामार्गालगत सर्व्हिस रोडवर करण्यात आलेले अतिक्रमण तात्काळ हटवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अंधानेर येथील शेतकरी सुभाष तारासिंग जाखड व निसार शेख मुनीर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, त्यांच्या गट क्रमांक १४६ व १४७ मधील शेतीजमिनी लगत धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्ग आहे. पूर्वी येथे सर्व्हिस रोड व मोकळी जागा उपलब्ध होती. मात्र काही व्यक्तींनी बेकायदेशीरपणे हॉटेल, दुकाने, पत्र्याचे शेड तसेच अन्य बांधकाम करून अतिक्रमण केले आहे.

यामुळे सर्व्हिस रोड पूर्णपणे बंद झाला असून शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी मोठा अडथळा निर्माण झाला आहे. बैलगाडी, ट्रॅक्टर तसेच शेतीसाठी लागणारे साहित्य ने-आण करणे कठीण झाले असून सध्या पायी जावे लागत असल्याची तक्रार त्यांनी केली आहे.
तसेच बसथांब्यावरही अतिक्रमण करून काहींनी खाजगी व्यवसाय सुरू केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिक व शेतकऱ्यांची गैरसोय वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तात्काळ कारवाई करून सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे हटवून सर्व्हिस रोड व शेतकऱ्यांचा मार्ग मोकळा करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य रेखाचित्र 21 हजार वह्यांतून साकारले!

### आ. विलास (बापू) भुमरे यांच्या संकल्पनेतून अनोखा उपक्रम; कला, शिक्षण आणि इतिहासाचा प्रेरणादायी संगम

➤ पैठण : सर्जेराव खडसन
येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास भुमरे यांच्या संकल्पनेतून श्रीक्षेत्र पैठण बाहेरील नाथ मंदिर परिसरातील दत्त मंदिरासमोर तब्बल २१ हजार शालेय वह्यांतून धर्मवीर संभाजी महाराजांचे भव्यदिव्य रेखाचित्र साकारण्यात आले.

प्रसिद्ध चित्रकार उद्देश गोर्धन पघळ यांनी अत्यंत कल्पकता, संयम आणि मेहनतीच्या जोरावर हे अनोखे कलादालन उभे केले. हजारो वह्यांची अचूक मांडणी करून त्यांनी संभाजी महाराजांचा तेजस्वी, प्रेरणादायी आणि पराक्रमी चेहरा साकारला. हे रेखाचित्र पाहताना उपस्थित शिवप्रेमींमध्ये उत्साह आणि अभिमानाची

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● पैठण येथे संभाजी महाराज जयंतीनिमित्त आगळावेगळा उपक्रम
● तब्बल २१ हजार शालेय वह्यांचा वापर करून भव्य रेखाचित्र साकार
● प्रसिद्ध चित्रकार उद्देश गोवर्धन पघळ यांची कलाकृती ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू
● शिवप्रेमी नागरिकांनी मोठी गर्दी करत उपक्रमाचे कौतुक केले
● शिक्षणाचे महत्त्व आणि इतिहासाचा अभिमान जपणारा संदेश

भावना निर्माण झाली. या भव्य कलाकृतीचे दर्शन घेण्यासाठी तालुक्यातील तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. विशेषत: युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये या उपक्रमाबद्दल मोठे आकर्षण दिसून आले. कला आणि इतिहासाचा सुंदर संगम अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

या उपक्रमातून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले असून शालेय वह्यांच्या माध्यमातून इतिहासाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संदेश देण्यात आला. धर्मवीर संभाजी महाराजांचे शौर्य, राष्ट्रनिष्ठा, स्वाभिमान आणि हिंदवी स्वराज्यासाठीचे बलिदान यांची आठवण या कलाकृतीमुळे पुन्हा जागवली गेली. पैठणमधील हा अनोखा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरत असून कला, शिक्षण आणि इतिहास यांचा संगम घडवणाऱ्या या अभिनव कल्पनेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




## शॉर्ट सर्किटमुळे शेतात आग; एक एकर ऊस जळून खाक

➤ कन्नड / प्रतिनिधी :
तालुक्यातील निमडोंगरी येथे विद्युत तारांच्या शॉर्ट सर्किटमुळे शेतात आग लागून सुमारे एक एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना रविवारी (१० मे) दुपारी घडली. या घटनेत शेतकऱ्याचे अंदाजे १ लाख ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याबाबत कन्नड ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, छायाबाई अण्णासाहेब गावंडे (रा. निमडोंगरी) यांच्या हतनूर शिवारातील गट क्रमांक ४०४ मध्ये दोन एकर ऊस लागवड केलेली होती. त्यापैकी एक एकर ऊस आधीच कारखान्यास दिला होता, तर उर्वरित एक एकर ऊस शेतात उभा होता. रविवारी दुपारी त्यांचा मुलगा शेतात पाणी देत असताना उसाच्या शेतातून धूर येताना दिसला. जवळ जाऊन पाहिले असता विद्युत ट्रान्सफार्मरमध्ये शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याचे लक्षात आले. त्याने तत्काळ आरडाओरड करून शेजारील शेतकऱ्यांना मदतीसाठी बोलावले. मात्र मदत पोहोचण्यापूर्वीच संपूर्ण ऊस जळून खाक झाला. या घटनेत सुमारे पावणे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले असून, याबाबत कुणावरही संशय नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक जळीतची नोंद करण्यात आली असून सहायक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व समाधान शिबीर



आष्टी : धामणगाव महसूल मंडळ, भंडारवाडी, ता. धामणगाव येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व समाधान शिबीर अभियान यशस्वीरित्या संपन्न झाले.

# जायकवाडी धरणाच्या कुशीत तहानलेली माणसं; नाथ निकेतन वसाहतीत पाण्यासाठी नागरिकांची वणवण

### ➤ भर उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न; प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप

➤ पैठण / सर्जेराव खडसन :
जायकोवाडी धरण परिसरालगत असलेल्या नाथ निकेतन कॉलनी येथे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने नागरिकांचे जीवन अक्षरश: विस्कळीत झाले आहे. पिंपळवाडी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या या वसाहतीमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना थेंबथेंब पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

भर उन्हाळ्यात महिला, वृद्ध, लहान मुले तसेच कामगार वर्गाचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. डोक्यावर घागरी घेऊन उन्हाच्या तीव्र झळांमध्ये पाण्याच्या शोधात मैलोनमैल फिरण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. अनेक कुटुंबांना रात्री उशिरापर्यंत पाण्याच्या टँकरची प्रतीक्षा करावी लागत असून, पाण्यासाठी होणारी धावपळ दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

विशेष म्हणजे, जायकवाडी धरणाच्या अगदी जवळ वसलेली ही वसाहत आज पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. "धरण शेजारी असूनही आम्हाला पाण्यासाठी भटकावे लागत आहे, ही प्रशासनासाठी



लाजिरवाणी बाब आहे," अशा संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केल्या.

### आ. विलास भुमरे यांनी लक्ष घालावे — नागरिकांची मागणी

आ. विलास भुमरे यांनी या गंभीर प्रश्नात तातडीने लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. "जायकवाडी धरणाच्या कुशीत राहणाऱ्या नागरिकांना जर पिण्याच्या पाण्यासाठी भटकावे लागत असेल, तर ही केवळ प्रशासनाची अपयशी व्यवस्था नसून संवेदनाहीन कारभाराचे जिवंत उदाहरण आहे," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. रिकाम्या घागरी आणि पाण्यासाठी होणारी नागरिकांची धावपळ आता प्रशासनाच्या उदासीनतेची साक्ष ठरत असल्याची तीव्र प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● नाथ निकेतन वसाहतीत भीषण पाणीटंचाई ● महिला, वृद्ध आणि लहान मुलांचे हाल ● जायकवाडी धरण शेजारी असूनही नागरिक तहानलेले ● टँकरच्या प्रतीक्षेत नागरिकांना रात्र जागून काढावी लागते ● ग्रामपंचायत व पाणीपुरवठा विभागावर निष्काळजीपणाचे आरोप ● नियमित पाणीपुरवठा न झाल्यास आंदोलनाचा इशारा



ग्रामपंचायत प्रशासन, ग्रामसेवक तसेच पाणीपुरवठा विभागाच्या कथित निष्काळजीपणा आणि ढिसाळ नियोजनामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. "निवडणुकीच्या वेळी घराघरात येणारे लोक आता पाण्याच्या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, तात्काळ नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.



## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

### प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन; प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती

धारूर किल्ले / प्रतिनिधी :
येथे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालय मध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रा. एस के काळे, युराज जाधव, विलास चौधरी, अशोक जगताप, शिंदे मॅडम, संजय गुरव, सुरेश जोगदंड यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी धर्मवीर संभाजी महाराजांच्या शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. कार्यक्रमात इतिहासातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठा जोपासावी, असा संदेश देण्यात आला.

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● राजमाता जिजाऊ महाविद्यालयात संभाजी महाराज जयंती साजरी
● प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते अभिवादन ● पुष्पहार अर्पण करून इतिहासाला मानवंदना ● प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित



### वाहतूक पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह ➤ नवीन बसस्टँड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावर तासनतास ट्रॅफिक जाम

# गेवराईत भीषण वाहतूक कोंडी; बसस्टँडसमोर वाहनांचा ठिय्या, नागरिक संतप्त








➤ गेवराई / शेख खाजा :
शहरातील अत्यंत गजबजलेल्या नवीन बसस्टँड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मुख्य मार्गावर गुरुवारी (दि. १४ मे) भरदुपारी अचानक झालेल्या भीषण वाहतूक कोंडीमुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. अवघ्या काही मिनिटांत संपूर्ण मार्ग वाहनांनी ठप्प झाल्याने नागरिक, प्रवासी आणि वाहनचालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.

वाहनांची संख्या अचानक वाढल्याने नवीन बसस्टँड परिसरात



चारीही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. दुचाकी, चारचाकी, प्रवासी बसेस, मालवाहू ट्रक तसेच रुग्णवाहिकाही या कोंडीत अडकून पडल्या. मे महिन्यातील कडक उन्हात वाहनधारक आणि प्रवाशांचे अक्षरश: हाल झाले. विशेष म्हणजे पांढरवाडी फाटा ते जमजम परिसरापर्यंत वाहतूक कोंडी निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत "हा ट्रॅफिक जाम आहे की रस्ता रोको आंदोलन, काहीच समजेनासे झाले होते," अशी भावना व्यक्त केली. शहरातील वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी असलेल्या वाहतूक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर यानिमित्ताने गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. वाहतुकीचे नियोजन योग्य पद्धतीने करण्यात अपयश आल्यामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांनी केला. "मुख्य चौकांमध्ये वाहतूक

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● गेवराई शहरात भरदुपारी मोठी वाहतूक कोंडी ● नवीन बसस्टँड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्ग ठप्प
● रुग्णवाहिका, बसेस, मालवाहू वाहनेही अडकली ● वाहतूक पोलिसांच्या निष्काळजीपणाचा नागरिकांचा आरोप
● संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी ● पांढरवाडी फाटा ते जमजम परिसरापर्यंत वाहनांच्या रांगा

नियंत्रणासाठी पोलिसांची उपस्थितीच दिसत नव्हती. वेळेवर नियोजन झाले असते तर इतकी मोठी कोंडी झाली नसती," असे स्थानिक व्यापारी व वाहनचालकांनी सांगितले.

शहरातील वाढती अतिक्रमणे, अव्यवस्थित पार्किंग आणि वाहतूक विभागाचे कथित दुर्लक्ष यामुळे गेवराईकरांमध्ये आधीपासूनच नाराजी होती. गुरुवारी झालेल्या प्रकारानंतर नागरिकांचा संताप आणखी तीव्र झाला असून संबंधित वाहतूक अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करून निलंबन करण्यात यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. दरम्यान, प्रशासनाने तातडीने वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी दिला आहे.